# प्रकरण पहिले

## श्रीज्ञानदेव : जीवनचरित्र व कार्य --

# प्रकरण पहिले

## श्री ज्ञानदेव : जीवन चरित्र व कार्य ---

### प्रास्ताविक --

ज्ञानदेवांचे सामाजिक कर्तृत्व व सांस्कृतिक कर्तृत्व यांचा मूलस्त्रोत कोठे आहे याचा शोध घेण्याच्या हेतूने ज्ञानदेवांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केलेला आहे. ज्ञानदेवांचे जीवनचरित्र जेवढे अलौकिक आहे तेवढेच ते लौकिकही आहे. ज्ञानेश्वरकालीन धार्मिक आणि सामाजिक जीवन गढूळ बनले होते हे धार्मिक आणि सामाजिक जीवन स्वच्छ करण्याचा प्रयत्न ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथलेखनाच्या माध्यमातून केलेला आहे. आपल्या योगबळाने वठणीवर न येणाऱ्या कर्मठ व स्वार्थपरायण ब्राह्मणांना वठणीवर आणलेले आहे.

ज्ञानदेवांना बावीस वर्षांचे आयुर्मान लाभले. अवघ्या बावीस वर्षात एवढे प्रचंड सामाजिक व वाङ्‌मयीन कार्य होणे असंभव आहे. त्यांच्या ग्रंथातून प्रौढ प्रगल्भ व गंभीर विचार व्यक्त झालेले आहेत तेव्हा ज्ञानदेवांचे वय बावीस पेक्षा जास्त असावे असा एक तर्क आहे. हा एक संशोधनाचा विषय असल्याने प्रस्तुत प्रकरणात हा वाद उपस्थित केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात ज्ञानेश्वर-कालीन धार्मिक व सामाजिक जीवनातून ज्ञानदेवांनी कोणती प्रेरणा घेतली ? या प्रेरणेने त्यांच्या जीवनचरित्राला कोणती दिशा मिळाली ? आणि त्यांच्या वाङ्‌मयीन कार्याचा परामर्श या प्रकरणात घेतलेला आहे.

ज्ञानदेवांचे जीवनचरित्र जेवढे चमत्कारिक व अलौकिक आहे तेवढेच ते लौकिक व शक्यप्राय: आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी रचली त्या काळात ज्ञान व अध्यात्म

ही मूठभर उच्चवर्णीयांची मिरासदारी मानली जात होती. स्त्री शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारलेला होता. बहुजन समाजाला आत्मविकासाचा मार्ग खुला करुन देण्यासाठी ज्ञानदेवांनी प्रथम पुढाकार घेतला. संस्कृत भाषेत बंदिस्त झालेली ज्ञानगंगा मराठी सारख्या भाषेत आणून महाराष्ट्रात ब्रह्मविद्येचा सुकाळु केला. अगतिकतेतून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी वारकरी चळवळ जन्माला आली. तिचे पहिले उद्गाते ज्ञानेश्वर आहेत.भक्तीच्याद्वारा परमेश्वर प्राप्ती करता येते हा विश्वास लोकांच्या मनामध्ये निर्माण केला.

यादवपूर्वकाळापासून हिंदूसमाज धार्मिक आणि सामाजिक समस्येच्या उद्रेकातून विघटनाच्या दिशेने मार्गक्रमण करीत होता. स्त्रिया आणि शुद्र यांची अवस्था अतिशय दयनीय होती. मानवतावादी मूल्यांचे अवमूल्यन चालले होते. धर्मतत्वाचा विपरित अर्थ लावून स्वार्थ साधण्यात मग्न झालेल्या धर्ममार्तंडांनी समाजाची दिशाभूल चालवली होती. खरा धर्म व्रतवैकल्य,यज्ञयाग, दानधर्म व मूर्तीपूजा यांच्या आचरणामध्ये आहे असे चुकीचे दिग्दर्शन स्वार्थपरायण समाजधुरीणांकडून केले जात होते. ज्ञानेश्वरकालीन समाजामध्ये धार्मिक अराजकत्व सुरु होते अशा या असंतोषजनक परिस्थितीत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाला आपल्या नाथ पंथाचे तत्वज्ञान देऊन भागवतधर्माची उभारणी केली. भागवतधर्माच्या झेंड्याखाली सर्व धर्मियांना एकत्रित करुन सामाजिक ऐक्य साधण्याचा पहिला प्रयत्न ज्ञानदेवांनी केला. ज्ञानदेवांच्या जीवन चरित्राचा व वाङ्मयीन कार्याचा अभ्यास पुढीलप्रमाणे केलेला आहे.

## ज्ञानदेवांचे आई-वडील --

ज्ञानदेवांचे घराणे मुळचे आपेगावचे हे आपेगाव पैठण पासून चार कोसावर गोदावरीतीरी वसलेले आहे. तेथील कुलकर्णी या घराण्यात वंशपरंपरागत होते.

ज्ञानदेवांच्या पूर्वजांची माहिती त्यांच्या पणज्याचे पणजे हरिहरपंत यांच्यांपासून पुढे मिळते हे हरिहरपंत बाराव्या शतकातील असावेत. त्याचे पंतू त्र्यंबकपंत हे प्रथम देवगिरीवर यादवांच्या व पुढे गोरखनाथांच्याकृपेने अमरण देवाच्या सेवेत होते. या त्र्यंबकपंतास दोन मुलगे यापैकी हरिहरपंत इ.स.१२१३ मध्ये देवगिरीच्या सिंघणराजाच्या बाजूने लढतास कामास आले असे इतिहास सांगतो. ज्येष्ठ पुत्र गोविंदपंत आणि नीराई या दोघानाही गहिनीनाथांचा उपदेश होता.त्यांच्या पोटी जणू मूर्तिमंत डोळस वैराग्य असे विठ्ठलपंत जन्मले. विठ्ठलपंतानी शास्त्राध्ययन केले .तीर्थयात्रा आरंमली,योगायोगाने आळंदीच्या सिधोपंत कुलकर्णी यांच्या मुलींशी रुक्मिणीशी ते विवाहबध्द झाले आणि यात्रा आटोपून आपेगावी परतले. आता ते सदढ संसाराची मांड मांडतील अशी सर्वांची कल्पना पण नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे `संसाराची चिंता नाही विठ्ठलाशी । अखंड वृत्तीशी समाधान ।` अशी त्यांची स्थिती होती. नित्य हरिकथा ऐकाव्यात,संताचे दर्शन सर्वकाळ घ्यावे यातच हा विठ्ठल ` एकाएकी सुखरुप होत असे, विरक्ती बळावत गेली आणि विठ्ठलपंतानी गृहत्याग करुन काशीच्या कोणाश्रीपाद स्वामीकडून संन्यासदीक्षा घेतली. विठ्ठलपंताचे आता चैतन्याश्रम झाले. योगायोगाने श्रीपादस्वामीना खरा प्रकार समजला आणि विठ्ठलपंतास पुन: एकवार संसारात लोटून वा` अविधिकर्माचे न धरावे भय आणि सुखरूप स्वधर्म चालवावा` असे त्यांना बजावले. पंत आपेगावास परतले आणि संन्यासश्रमातून गृहस्थाश्रमात परत आल्यामुळे जननिंदेस तोंड देऊ लागले. अशी बारावर्षे गेली आणि शके ११९५ दोन दोन वर्षाच्या अंतराने त्यांना निवृत्ति,ज्ञानदेव,सोपान आणि मुक्ताबाई अशी चार मुले झाली.याप्रमाणे विठ्लपंताचा संसार सफळ झाला खरा पण किती झाले तरी ती संन्यासाचा संसार काही केल्या मुळ धरीचना जननिंदा सहन न झाल्याने ब्रह्मवृंदास शरण गेले व ब्रह्मवृंदाने दिलेला निर्णय ग्राह्य मानून प्रयागच्या त्रिवेणी संगमात त्यांनी देहत्याग केला.[१]

ज्ञानदेवांनी जे धर्मसंकीर्तन केलेले आहे या धर्मसंकीर्तनला ज्ञानदेवांचे ऋणीतुल्य

वेदाध्ययनसंपन्न वडील कारणीभूत ठरलेले आहेत. विठ्ठलपंताच्या पोटी जन्माला आलेली संतती धर्मबाह्य नसून धर्मग्राह्य याविषयीचे स्पष्ट मत विठ्ठपंताना व्यक्त करता येण्यासारखी धार्मिक आणि सामाजिक परिस्थिती अनुकूल नव्हती. विठ्ठलपंत वेदांत जाणणारे होते. वेदांतील खरा धर्म त्यांना माहित होता. त्याकाळी जरी विठ्ठलपंताना ख-या धर्माचे स्वरूप स्पष्ट करणे अशक्य असले तरी त्यांच्यापोटी जन्मलेली संततीच ख-या धर्माचे मार्गदर्शन जगाला करून देईल या दूरदृष्टीने विठ्ठलपंतानी आपल्या किशोरवयीन मुलांवर वैदिक परंपरेचे व वेदांताचे संस्कार केले असावेत. तसे ते संस्कार करीत होते. "गावाबाहिरील पर्णकुटीत राहात असलेले वेदविद्यासंपन्न विठ्ठलपंत आपल्या मुलांवर संस्कार घडविण्याचा कसोशीने प्रयत्न करीत. स्वत: पंत अध्यापकवृत्तीचे असल्याने त्यांना ते जड नव्हते. पंताची ही झोपडी म्हणजे वेदकाळातील महर्षींच्या आश्रमांची प्रतिकृतीच होती. इंद्रायणी तीरावरील ही पवित्र वस्तू ज्ञानाचे आणि धर्म शिक्षणाचे धर्मसंकीर्तन प्रवृर्तित करणारी महाशालाच बनली. त्या सर्वेश्वराने भारतातील सनातन धर्मावर झालेला हल्ला परतवून लावण्यासाठी ही चार मावंडे महाराष्ट्राच्या ओटीत घातली आणि त्यांच्याद्वारे धर्मक्षितिजावरील अंधकार दूर करण्याचा शाश्वत व भक्कम पाया घातला. या अढळ अभेद्य आणि अध्यात्ममूलक पायावरच पुढे ज्ञानदेवांनी अखंडपणे धर्म संकीर्तन केले." [२]

ज्ञानदेवांच्या संवेदनशील मनावर त्यांच्या आई-वडिलांच्या देहान्त प्रायश्चिताच्या घटनेचा खोलवर परिणाम होऊन धर्ममार्तंडांनी दिलेला निर्णय खरा की खोटा याचा बोध घ्यावयाच्या सत्वशोधार्थ भूमिकेतून ज्ञानदेवांनी अनेक धर्मग्रंथाचा धांडोळा घेतला असावा. धांडोळा घेत असता वाचन मनन चिंतन तर्क करता करता ख-या धर्माचे स्वरूप गीतेत समजले असावे. गीतेतील ख-या धर्माचे स्वरूप लोकांना सांगून आनंदाचे आवार मांडण्याची आनंदाची किनार ज्ञानदेवांच्या जीवनचरित्राला आहे.

ज्ञानदेवांचा जन्मकाळ –

ज्ञानेशाचे कार्य व व्यक्तित्व थोर असले तरी त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील काही घटनांबद्दल अभ्यासकात एकमत नाही. निवृत्तिनाथ,ज्ञानदेव,सोपानदेव आणि मुक्ताबाई या भावंडांचा जन्मकाळ हा वादाचा विषय आहे. या वादावादीत न शिरता "ज्ञानेश्वरांनी आपल्या बालछंदाच्या अभंगात ' बालछंदे ' बावीस जन्मे । तोडिली भावार्थाची कर्मे ' असा आपल्या बावीसव्या वर्षी घ्यावयाच्या समाधीचा उल्लेख केलेला आहे. त्यांचा समाधीकाळ शके १२१८ ( इ.स.१२९६ ) हा आता सर्वमान्य झालेला आहे.त्यांच्या आधारे शोध घेता ज्ञानेश्वरांचा जन्मकाळ हा श.११९७ ( इ.स.१२७५ ) असाच येतो?"[३]

ज्ञानदेवांची गुरूपरंपरा --

ज्ञानेश्वरांच्या जन्म बालपण,शिक्षण वगैरे गोष्टीविपूल ,सविस्तर विवेचन करण्यासारखी आज जरी परिस्थिती नसली तथापि त्यांनी आपल्या दिव्य प्रतिभेच्या साहाय्याने निर्माण केलेल्या वाङ्मयदधीचे मंथन करून त्यातून यांचा विद्यावंश कोणता होता सांप्रदायिक परंपरेने यांनी कोणती काव्यसंपदा प्रकर्षाला नेली,कोणत्या तत्वज्ञानाचा प्रकाश जनतेमध्ये पाडून त्यावेळी लोपलेले ज्ञान पुन्हा प्रचलित करण्याचा प्रयत्न केला हा ज्ञानाचा प्रसार यांना कोणत्या गुरूपासून प्राप्त झाला यांची गुरूपरंपरा कोणती या परंपरेचे तत्वज्ञानाच्यादृष्टीने काही वैशिष्ट्य आहे की नाही इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे मिळविता येणे शक्य आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या समारोपातच आपल्या गुरूपरंपरेचा व जीवनकार्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आपल्या गुरूपरंपरेविषयी ज्ञानेश्वर म्हणतात --

क्षीरसिंधुपरिसरी । शक्तीच्या कर्णकुहरी
नेणो कै श्रीत्रिपुरारी । सांगितले जे ।।
ते क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरी गुप्तु ।
होता तयाचा हातु । पैठे जाले ।।'

तो मत्स्येंद्र सप्तशृंगी । मग्नावयवा चौरंगी ।
भेटला की तो सर्वांगी । संपूर्ण जाला ।।
मग समाधि अव्यत्यया । भोगावी वासना या ।
ते मुद्रा गोरक्षराया । दिधली मीनी
तेणे योगाब्जिनीसरोवरू । विषयविध्वंसैकवीरू ।
तिये पदी का सर्वेश्वरू । अभिषेकिला
मग तिही ते शांभव । अद्वयानंदवैभव
संपादिले सप्रभव । श्रीगहिनीनाथा ।।
तेणे कळिकळितु भूता । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तीनाथा । दिधली ऐसी ।
ना आदिगुरू शंकरा । लागोनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा संसरा । जाला जो अमुते ।
तो हा तू घेऊनि आधवा । कळी गिळितया जीवा
सर्व प्रकारी धावा । करी पा वेगी
परी सत्याचि गुरूनाथे । निमित्त करुनि माते ।
प्रबंधव्याजे जगाते । रक्षिले जाणा ( १८। १७५१, १७५८, १७६५ )

आदिगुरू शंकरापासून गुरूशिष्यपरंपरेने बोधाचा उपदेश निवृत्तिनाथांपर्यन्त आलेला आहे. निवृत्तिनाथानी हा बोध उपदेश ज्ञानदेवांना केला. ज्ञानदेवांनी हा नाथांचा उपदेश सर्वसामान्य जनतेला सांगितला त्यामुळे ज्ञानदेव हे सर्वसामान्यांचे गुरू झाले.

ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायातील तत्वज्ञानाचा स्वीकार केलेला आहे. नाथ संप्रदायाच्या तत्वज्ञानाचा प्रचार केलेला आहे. नाथसंप्रदायातील ज्ञान लोकांपर्यन्त पोचवलेले आहे. परंतु ज्ञानदेवांनी नाथसंप्रदायाच्या तत्वज्ञानाची डोळसपणे पाहणी केलेली आहे. ज्ञानदेवांनी आपल्या प्रतिमेचा संस्कार नाथसंप्रदायाच्या तत्वज्ञानावर केल्याने हे ज्ञान रोचक ,रंजक व उद्बोधक झालेले आहे.

ज्ञानेश्वरांनी आवश्यक तेवढाच नाथसंप्रदायाच्या तत्वज्ञानाचा स्वीकार केलेला आहे आणि तोही चिकित्सक बुध्दीने केलेला आहे.` ज्ञानेश हे शैव म्हणजे नाथ संप्रदायातील तत्वज्ञानाचा विश्वोधारार्थ सर्वत्र ग्रंथद्वारा प्रचार करीत आहेत. याविषयी कोणाही सुबुध्द माणसास निराळा संशय येण्याचे कारण राहणार नाही. ज्ञानेश हे संप्रदायाने शैव परंपरेतील होते हे त्यांनी स्वत:च लिहून ठेवले असल्याने जरी निर्विवाद सिध्द होत असले तरी त्यांची दृष्टी ही चिकित्सक असल्याने सांप्रदायिक सिध्दांत केवळ त्यातील वचनावरच अंधविश्वास ठेवून त्यांनी ते मान्य केलेले नाहीत.कोणत्याही मताचा स्वीकार करताना त्या मताची ज्या प्रमाणे शास्त्रत: गुरूत: आणि आत्मप्रत्यत: अशा तीन प्रकाराने पारख करून ते स्वीकारणे प्रशस्त असते.त्याप्रमाणे ज्ञानेशानीही या शैवसंप्रदायाचाही वर लिहिलेल्या तीन प्रकारानी परीक्षा करूनच त्यातील स्वानुभवाला उतरला तोच अंश त्यांनी स्वीकारला आहे. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील भक्तीच्या निरूपणा प्रसंगाने लिहिलेली ज्ञानेशांची एक ओवी आम्ही या आमच्या विधानास पोषक म्हणून येथे उध्दृत करीत आहोत.

> ज्ञानी इयेते स्वसंविती । शैव म्हणती शक्ति ।
> आम्ही आपुली भक्ती । परम म्हणो ।।` ४

योगेश्वर श्रीकृष्णांनी भागवतरुपाने ब्रह्मदेवास जो उपदेश केलेला आहे,त्यास शैव` शक्ती ` म्हणतात , तर परमेश्वरमुखातून ज्ञानेश्वर भक्ती म्हणतात,शैव शक्ती म्हणतात तेव्हा आपण त्या संप्रदायाच्या तत्वज्ञानाचा स्वीकार केलेला आहे म्हणून शक्ती म्हणावे असा विचार ज्ञानेश्वर करीत नाही ते म्हणतात क्रमयोगी परमेश्वराशी ऐक्य पावतो तेव्हा त्याची भक्ती फलरूप होते म्हणून देवाने भागवतरूपाने केलेला बोध शक्ती नसून परमभक्ती आहे.

## ज्ञानेश्वरकालीन समाज जीवन --

ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राचे यथार्थ आकलन करून घेण्यासाठी ज्ञानेश्वरकालीन

समाजस्थिती समजावून घेणे गरजेचे आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचे कर्तृत्व हा निवृत्तिनाथांचा कृपाशीर्वाद म्हटलेले आहे.

ऐसे श्रीनिवृत्तिनाथांचे । गौरव आहे जी साचे ।
ग्रंथु नोहे हे कृपेचे । वैभव तिये ( १८ । १७५० )

हा माझा ग्रंथ नसून निवृत्तिनाथाच्या कृपेचे ऐश्वर्य आहे. असे ज्ञानदेवांनी म्हटलेले असले तरी ज्ञानेश्वरीच्या निर्मितीच्या अनेक प्रेरणा आहेत तशीच समाज स्थिती ही एक प्रेरणा आहे "कोणत्याही कलाकृतीचे अथवा विचारवंताच्या कार्याचे यथार्थ आकलन होण्यासाठी तत्कालीन समाजस्थिती लक्षात घेणे आवश्यक असते. कारण तो कवी वा विचारवंत आपल्या काळाचा आणि समाजाचा प्रतिनिधी असतो त्याचे विचार अथवा कलाकृती जितकी स्वतंत्र असते तितकीच ते समाज सापेक्ष आणि कालसापेक्षाही असते म्हणून ज्ञानेश्वरांच्या काव्यनिर्मिती मागील प्रेरणा ज्या परिस्थितीत घडल्या होत्या ती समजावून त्यांच्या काव्याचे आणि कार्याचे मर्म अधिक यथार्थपणे आकलन होऊ शकेल." ५

ज्ञानेश्वरकालीन धर्ममार्तंडांनी धर्मभावना व धर्मकल्पना याचे खोटे अवडंबर माजवून पवित्र धर्माचे मूळ स्वरूप बिघडवून टाकलेले होते. धर्मभ्रमाचे वातावरण निर्माण करून खरा धर्म झाकाळून टाकलेला होता.महाराष्ट्रीय बहुजन समाजामध्ये विषम भावना निर्माण करून तत्कालीन समाज संभ्रमित केलेला होता."महादेव आणि रामदेव या शेवटच्या दोन यादव सम्राटांचा करणाधिप हेमाद्रि पंडित याचा 'चतुर्वर्गचिंतामणी' हा प्रचंड ग्रंथ कर्मकांडाच्या या अतिरेकाचा निदर्शक म्हणून दाखविता येईल, त्यामुळे समाजाचे गुरुत्व नेतृत्व आणि शासन करणारे वरिष्ठ वर्ग आणि त्यांची सेवा, शुश्रूषा करण्यासाठी म्हणून जन्माला आलेले कनिष्ठ वर्ण यांच्यातील दुरावा इतका पराकोटीला गेला की विद्वता आणि वैभव यांच्या शिखरावर आरूढ झालेले पंडित आणि राजन्य व दारिद्र्याने गांजलेले आणि दिङमूढ होऊन गेलेले सामान्य लोक यांच्यात कोणत्याही प्रकारचा जिव्हाळा उरलेला नव्हता.चातुर्वर्ण्य आणि त्यातून उत्पन्न झालेले जातीभेद यांच्यामुळे हिंदुसमाजाचे वेगवेगळे घटक हे आधीच एकमेकांपासून

विभक्त होऊन गेलेले होते. ग्रामसंस्था हा महाराष्ट्रातील राज्यकारभाराचा पाया होता. या गावगाड्याची उभारणी जातीना धन्दे आणि वतने यांची जोड देऊन करण्यात आली होती. त्यामुळे ही जातीभेदजन्य विभागणी आणि विषमता हे समाजाइतकेच शासनाचेही प्रभावी अंग होऊन बसले त्याचा परिणाम असा झाला की मराठी लोकगंगेचा विशाल आणि भव्य प्रवाह जागोजागी खंडित होऊन तिच्या पात्रात जातगंगेचे हजारो ओहळ उत्पन्न झाले." [६]

ज्ञानेश्वरकालीन समाज जीवनात कर्मकांडाचा बडेजाव माजलेला होता. वरिष्ठ वर्गाची मिरासदारी वाढलेली ,कनिष्ठ वर्ग भरडला जात होता.जाती भेदानी समाज पोखरला जात होता.शासनसंस्था पक्षपात करीत होत्या.समाजामध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन समाज खंगलेला आणि भंगलेला होता. एकूणच ज्ञानेश्वरकालीन समाजस्थिती भयावह होती. ऐहिक सुखा समृध्दीचे चित्र वरवर दिसत होते मात्र समाजामध्ये आध्यात्मिक वास्तव ज्ञानाचा लोप होऊन अवास्तव कर्मकांडाचा प्रयत्नपूर्वक प्रसार मोठया प्रमाणात सुरु होता. सामाजिक ऐक्य भंग पावत होते.

ज्ञानेश्वरानी समकालीन जीवनाचे आकलन करुन सामाजिक ऐक्य टिकविण्यासाठी गीतार्थ निरूपणाला प्रारंभ केला.वारकरी संप्रदायाची पायाभरणी करुन आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली.सर्वधर्मसमभाव,सर्वाभूती परमेश्वर व वैश्विक कल्याण या तत्वाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ग्रंथलेखनास सुरुवात केली. कर्मकांडाचे प्रस्थ कमी करण्यासाठी ' राम कृष्ण हरी ' हा जपमंत्र दिला. परमेश्वर भक्तीमध्ये जातीचा वृथा अभिमान बाळगणाऱ्याचा अहंकाराचा फुगा भक्तीरूपी सुईने फोडताना ज्ञानेश्वर म्हणतात --

पै भक्ति एकी मी जाणे । तेथ साने थोर न म्हणे ।
आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ( ९ । ३९५ )

विविध अपप्रवृत्तींची धर्माच्या आश्रयाने होणारी जोपासना व त्यामुळे

समाजात निर्माण होणारी अनैतिकता यांचे उच्चाटन करुन ज्ञानेश्वरांनी समाज जीवन आणि धर्मसाधना यामध्ये समन्वय साधून ज्ञानदेवीतून नव्या युगप्रवर्तनाचा ओनामा केला. ज्ञानेश्वरकालीन समाजस्थितीमुळे ज्ञानेश्वरांच्या जीवन चरित्राला झळाळी प्राप्त झालेली आहे.

ज्ञानेश्वरकालीन धार्मिक जीवन --

ज्ञानेश्वरकालीन धार्मिक जीवनामध्ये व्रतवैकल्य,उद्यापने,यज्ञविधि याना अवास्तव महत्व प्राप्त झालेले होते. ज्ञानेश्वरांच्या काळात अस्तित्वात असणाऱ्या संप्रदायातील लोक गीता,ब्रह्मसूत्रे,उपनिषदे यांच्यावर संस्कृतभाषेतून टीका लिहिण्यात गढून गेले होते. धर्मभ्रष्ट स्वत:ला धर्मनिष्ठ समजत होते. मतामतांच्या गलबल्यामुळे बहुजनसमाज गोंधळलेल्या अवस्थेत दिशाहीन तारू सारखा भरकट होता "यादवांच्या राजवटी अखेर महाराष्ट्रातील शिष्ट व संपन्न लोक वर्णाश्रम धर्माप्रमाणे प्राप्त झालेली कर्तव्य विसरुन केवळ चैन करू लागले. ब्राह्मणांनी निरनिराळी व्रते निर्माण करुन पक्वाने झोडण्याकडे आपले लक्ष देऊन राष्ट्राच्या समोर त्यांची खरी कर्तव्ये जागृत ठेवण्याच्या आपल्या खऱ्या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे राष्ट्राच्या संरक्षणाला आवश्यक असा क्षात्रियवर्णही कर्तव्यच्युत झाला व पुढील आपत्तीचे ढग हळूहळू जमू लागले. राष्ट्रातील विद्वान लोकात विलक्षण मतभेद माजले ,त्यांचे सर्व पांडित्य संस्कृतमध्येच होऊ लागले,त्यामुळे वैदिकधर्म झुगारुन देणारी पाखंडे जन्मास येऊ लागली. राष्ट्रातील बहुजन समाजाची धार्मिक भूक ब्राह्मणांनी न भागविल्यामुळे तो असंतुष्ट झाला व मतमतांच्या गलबल्यामुळे श्रध्दाळू लोक गलबळून गेले."[७]

ज्ञानेश्वरांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये परिवर्तनाची गरज ओळखून आपल्या धर्मसंकीर्तनाच्या कार्याला प्रारंभ केला. येथूनच ज्ञानदेवांच्या जीवनकार्याला व्यापक स्वरूप प्राप्त होऊ लागलं. ज्ञानेश्वरांनी तत्कालीन परिस्थितीचे नीटसे अवलोकन केले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ' । इथे मृत्युलोकीचे उफराटे ।' कारण धर्मतत्व न कळल्यामुळे धर्मभ्रष्ट स्वत:ला धर्मनिष्ठ समजत होते. स्वत:च प्रायश्चिताई

झालेले असताना इतराना प्रायश्चित देऊन शुध्द करण्याच्या खटपटीत गुंतले होते. जन्माला आलेल्या वेळेपासून दिवसेंदिवस हा देह मृत्यूच्या जवळ जात असताही त्याचा खेद न वाटता उलट आनंदाने वाढदिवस साजरे करीत होते. ही सर्व परिस्थिती सुधारावी म्हणून ज्ञानेश्वरांनी गीता निरूपणाचे कार्य हाती घेतले.

ज्ञानदेव व नामदेव भेट --

पैठणाच्या पोथीनिष्ठ ब्राह्मणाना आपल्या यौगिक सामर्थ्याचा परिचय करून दिल्यानंतर ज्ञानदेव आणि त्यांची भावंडे नेवाशास आली तेथे ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांच्या अनुज्ञेने ' भावार्थदीपिका' सविस्तर निवेदिली ,त्यानंतर ते सर्वजन पंढरपूरला आले. पंढरपुरी भीवरेच्या वाळवंटामध्ये ज्ञानदेव आणि नामदेव यांची भेट झाली. ज्ञान आणि भक्ती यांचे ऐक्य झाले. ज्ञानदेव आणि नामदेव यांची भेट वारकरी संप्रदायाच्या समतोल वृध्दीस कारणीभूत ठरली ."ज्ञानदेवांनी महाराष्ट्रात ब्रह्मविद्येचा सुकाळ केला तर नामदेवामुळे हरिनामाचा सुकाळ झाला. ज्ञानेश्वरांचे अलौकिक व्यक्तिमत्व तत्कालीन सामान्य लोकांपुढे एखाद्या उच्च आदर्शाप्रमाणे झळाळत होते तर नामदेवांचे जीवन सामान्यासारखे सांसारिक अपवादांनी व व्यावहारिक झागड्यानी भरलेले असल्याने त्यांनी करून घेतला आध्यात्मिक विकास सामान्यांना त्यांच्या आवाक्यातील वाटावा असा अनुकरणीय होता. ज्ञानेश्वर हे ध्येयस्वरूप सिध्दपुरूष ठरले तर नामदेव त्या ध्येयमार्गाने जाऊ इच्छिणारांचे पहिले वाटाडे ठरले." [८]

ज्ञानदेवासमवेत केलेल्या तीर्थयात्रेची हकिगत स्वत: नामदेवानीच ' तीर्थावळी ' या प्रकरणात लिहून ठेवलेली आहे. तीर्थयात्रेच्या सहवासातून ज्ञानदेव व नामदेव यांच्यामध्ये मोठे सामजस्य निर्माण झाले, त्यामुळे मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात एक क्रांती घडून आली. ब्राह्मणकुळात जन्म झालेला असूनही ब्राह्मण म्हणून मान्यता मिळाली नाही,त्यांना कुळाचा लाभ झाला नाही पण शिम्प्यांच्या म्हणजे शूद्राच्या कुळात जन्मलेल्या नामदेवांना

मात्र कुळ लाभले असे कुळरहित आणि कुलयुक्त दोघे संत एकत्र आले त्यामुळे आध्यात्मिक क्षेत्रातील समताविचारांचा प्रसार द्रुतगतीने होण्यास मोठीच मदत झाली.

तीर्थयात्रा प्रसंगाने ज्ञानदेवाना हिंदू समाजातील भिन्न भिन्न जाती जमातीचे आचार विचार व श्रध्दासमजुतीचे अवलोकन करता आले. हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी, परंपरा, व्रतवैकल्य, आणि कर्मकांड यांचे दुष्परिणाम पाहता आले. जन्मजात उच्च-नीचतेमुळे आणि वर्णजाती विचारांच्या बंधनामुळे आपला समाज शतधा विदीर्ण झालेला त्यांना दिसून आला. म्हणून त्यांनी आपल्या अभंगामधून समाजातील आपआपसातील कृत्रिमभेद विसरुन जाण्याचे आवाहन केले. एकंदरीत पाहता ज्ञानदेव व नामदेवाची भेट वारकरी संप्रदायाच्या प्रसारास व सामाजिक समन्वयात्मक परिवर्तनास अत्यंत पोषक ठरली.

## ज्ञानदेवांनी ग्रंथ रचना व स्फुटरचना --

गीता हा तत्वज्ञानपर ग्रंथ परंतु ज्ञानेश्वरी हा साहित्य ग्रंथ असूनही आशयाच्या-दृष्टीने तत्वज्ञानपर ग्रंथ ठरतो. ज्ञानदेव हे अलौकिक प्रतिभेचे तत्वज्ञकवी असल्याने ज्ञानदेवीत काव्य व तत्वज्ञान यांचा मनोज्ञ समन्वय पहावयास मिळतो. समाज प्रबोधनासाठी गीता ग्रंथ निवडण्यात ज्ञानदेवानी फार मोठे औचित्य साधलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वातील तत्वज्ञकवी ,प्रतिभावंत साहित्यिक आणि प्रभावी नीतिशिक्षक यांचे सुंदर दर्शन ज्ञानेश्वरीत घडते. ज्ञानेश्वरी हा भाष्य ग्रंथ असल्याने लेखननिर्मितीवर काही बंधने होती. मात्र अमृतानुभव हा स्वतंत्र ग्रंथ असल्याने ज्ञानदेवांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार अमृतानुभवात घडतो. वारकरी संप्रदायाशी संबंध आल्यानंतर वारकरी कीर्तनासाठी अभंगाची निर्मिती केली.

## ज्ञानेश्वरी --

गेल्या सातशे वर्षापासून ज्ञानदेवीने मराठी मनाला संजीवन दिलेले आहे. तिच्या लेखनाचे निमित्त जरी गीताभाष्य असले तरी तेवढयापुरतेच या ग्रंथाचे स्वरूप

मर्यादित नाही. ज्ञानदेवांच्या नवोन्मेषशाली प्रज्ञेचा तो चैतन्यशाली असा काव्यात्मक आविष्कारही आहे "ज्ञानेश्वरांची भूमिका वादकुशल भाष्यकाराची नसून अभिजात कलावंताची आहे, त्यांचे तत्वनिरूपण हे श्रोत्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या समवेत केलेले ,तत्वन्विषणच आहे. त्यांच्या वाङ्.मयात वादाची खडाजंगी नाही. वक्ता आणि श्रोता यांच्यातील संवादसामरस्य ह्यावरच त्यांच्या वाङ्.मयाची उभारणी आहे. त्यांच्या निरूपणाची पध्दत अनुमानाची नसून अंतर-प्रतीतीची आहे. शवचिकित्सेची नसून सह अनुभूतीची आहे. त्यांच्या साहित्याचे आवाहन श्रोत्यांच्या कुशाग्रबुध्दीला नसून त्यांच्या हळुवार चित्तवृत्तीला आहे." [१]

ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानदेवांनी पुरस्कार केलेले तत्वज्ञान अद्वैतवादी आहे. शंकराचार्यांच्या प्रतिपादनातील ब्रह्म सत्य आहे व जीव आणि ब्रह्म एकच आहेत हा भाग त्यांनी स्वीकारलेला आहे परंतु जगन्मिथ्या तत्व नाकारलेले आहे. ब्रह्म सत्य आहे असे म्हटले तर सत्यातून सत्याचाच जन्म होईल. असत्य कसे जन्माला येईल ? असे विवेचन करताना ज्ञानदेवानी विश्व हे परमेश्वराचे विकसित रूप आहे ते आनंदमय आहे असे सांगितले आहे . या तत्वज्ञानाला चिद्विलासवाद असे नामाभिधान दिले जाते. ज्ञानदेवांचा वेदांत हा इतरभाष्यकारांप्रमाणे रूक्ष नसून अविनाशी व आनंदाची प्राप्ती करुन देणारा आहे.

अमृतानुभव --

पैठाणमध्ये शुध्दीपत्र प्राप्त झाल्यानंतर आळंदीकडे येताना प्रवरासंगमावरील मोहनीराजाच्या देवालयामध्ये ' पैसा ' या खांबाला टेकून ज्ञानदेवांनी ' ज्ञानेश्वरी ' चे निरूपण केले. ज्ञानदेवांच्या संजीवक आवाहनाचे सजीवत्व लाभलेल्या सच्चीदानंदाने ती लिहून घेतली. त्यानंतर ज्ञानदेवांची नामदेवाशी भेट झाली. त्यांनी व सर्व संतानी तीर्थयात्रा केली. तीर्थयात्रा पूर्ण करुन महाराष्ट्रात परत आल्यानंतर ज्ञानदेवानी निवृत्तिनाथांचे आज्ञेने ' अमृतानुभव ' लिहिला आणि निवृत्तिनाथाचे आशीर्वाद घेतले.

ज्ञानेश्वरीसारख्या प्रचंड भाष्यग्रंथाच्या निर्मितीनंतर आपले निखळ तत्वज्ञान सांगण्यासाठी ज्ञानदेवांनी ` अमृतानुभव ` लिहिलेला आहे. या ग्रंथाची एकूण दहा प्रकरणे आहेत. आणि सर्व मिळून ओवी संख्या आठशे सहा इतकी आहे. शिवशक्तिसामरस्य,सद्गुरुनमन,परावाणी,ज्ञान आणि अज्ञान, ज्ञानखंडन,पूर्णज्ञानी पुरुषाचे वर्णन आणि समारोप असा दहा प्रकरणाचा विस्तार आहे.त्यातील सातवे प्रकरण सर्वात मोठे असून त्यात दोनशे पंचाण्णव ओव्या आहेत. या प्रकरणात ज्ञान आणि अज्ञान हे प्रतियोगी शब्द कसे आहेत याचे विवेचन येते. जोपर्यन्त ज्ञानाची जाणीव आहे तोपर्यन्त अज्ञान हे असणारच म्हणून अज्ञान खंडनानंतर पुन्हा ज्ञानाचेही खंडन केलेले आहे. अज्ञान इतके नाहीसे झाले पाहिजे की त्याच्याविरुध्द अर्थदर्शक ` ज्ञान ` ज्ञान या शब्दाची आठवण बुझाली पाहिजे असे ज्ञानदेवानी म्हटले आहे.

<u>चांगदेव पासष्टी</u> --

ज्ञानदेवांकडे ज्याचे ग्रंथकर्तृत्व निरपवादपणे जाते असा ` चांगदेव पासष्टी ` हा तिसरा काव्यग्रंथ आहे." ज्ञानदेवांच्या वाग्वलास रम्य व त्यातल्या त्यात चांगदेवाच्या भूमिकेवर असणाऱ्यास व मुमुक्षासही ही पासष्टी अत्यंत रम्य व हितपरिणामकारक होय कारण वेदांताचे रहस्य जे अध्यात्मज्ञानाचे तत्व ते ज्ञानदेवांनी पासष्ट ओव्याच्याद्वारे समजावून सांगितले .उपनिषदे,भगवद्गीता व वेदांतसूत्र यातील सार मायभाषेत म्हणजे मराठीत सांगितले." [१०]

" चांगदेवपासष्टी ` ची रचना आळंदीस इ.स.१२९४ च्या सुमारास झालीअसावी. ज्ञानेशाची कीर्ती ऐकून चांगदेवानी ज्ञानेश्वरांना पत्र पाठविले. अनुभवाने मोठया पण वयाने मात्र लहान असणाऱ्या ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद लिहावा अशा संभ्रमात पडल्यामुळे शेवटी चांगदेवाने कोरेच पत्र ज्ञानेश्वरांकडे पाठवून दिले. पुढे निवृत्तिनाथांच्या आज्ञेने चांगदेवाच्या पत्रास ज्ञानदेवांनी उत्तर दिले, हे उत्तरात्मक पत्र म्हणजेच ` चांगदेवपासष्टी ` होय. पासष्ट ओव्यातून येथे

ज्ञानेश्वरांनी चांगदेवाना पूर्ण बोध केलेला आहे.

चांगदेवा तुझेनि व्याजे । माउलिया श्री निवृत्तिराजे
स्वानुभाव रसाळ खाजे । दिधले लोभे "

असे विनयपर उद्‌गार काढून आपल्या लेखनाचे सारे श्रेय ज्ञानेशानी निवृत्तिनाथ व चांगदेव यांना दिले आहे. ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञान जसे अमृतानुभवात साररूपाने आले आहे तद्वतच अमृतानुभवातील तत्वज्ञान पासष्टीत अधिक सूत्रबध्दपणे मांडले आहे. अमृतानुभवाचे तर्कशुध्द सार जसे या ग्रंथाचे स्वरूप आहे. "चिद्‌विलासवादाच्या भूमिकेनेच पूर्णाद्वैताचा बोध ज्ञानेशानी येथे केला आहे." [११]

ज्ञानदेवांचे अभंग --

ज्ञानदेवांमधील ख-या कवीचे दर्शन त्यांच्या अभंगामधून होते असे अनेक समीक्षकांचे मत आहे "ज्ञानदेवांची काव्यवृत्ती अभंगरचनेमध्ये बहरास आली त्यांची प्रतिभा निरंकुश झाली आणि त्यामुळे सो हं सिध्दीचे ळे त्यांच्या अभंगातून अवतरले. तेराव्या शतकातील नामदेव, पंधराव्या शतकातील एकनाथ आणि सतराव्या शतकातील तुकाराम या सर्वांच्या अभंगविश्वाला साधणारे सूत्र म्हणजे ज्ञानेश्वरांची अभंगवाणी होय." [१२]

"ज्ञानेश्वरी हे गीतार्थदर्शन असल्याने त्यात ज्ञानेश्वर प्राधान्य करुन दर्शनकाराच्याच भूमिकेतून बोलतात. ज्ञानेश्वरीत प्रकटत राहतो तो त्यांचा तत्वानुभव उलट त्यांच्या अभंगात निखळ आत्मानुभव आविष्कृत होतो असे दिसते. ज्ञानेश्वर 'ज्ञानदेव' कसे होते हे ज्ञानेश्वरी सांगते पण ते 'भावदेव' कसे होते हे सांगण्यासाठी अभंग पुढे सरसावलेत ।" [१३]

मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये पंथोपंथानी प्रतिपादिलेल्या भिन्न भिन्न विचारामुळे एक प्रकारचे वैचारिक आराजक उद्‌भवले होते .खरा धर्म आणि तद्‌नुसार योग्य असे आचरण याचा सामान्यजनांना नीटसा बोध होत नव्हता. अशा अनिश्चिततेत

आणि संभ्रमित अवस्थेत लोकांना निश्चित मार्गदर्शन होणे काळाजी गरज होती. ही गरज ज्ञानदेवांनी आपल्या सुस्पष्ट विचारांनी आणि अनुभूतीतून उत्पन्न झालेल्या अभंगाच्या माध्यमातून पूर्ण केली.

ज्ञानदेव व वारकरी संप्रदाय --

वारकरी संताच्या कामगिरीचे वर्णन करणारा बहिणाबाईचा 'संतकृपा झाली' हा अभंग सुप्रसिध्द आहे. त्यामध्ये त्यांनी ज्ञानदेवांच्या नेमक्या पण महत्वपूर्ण कर्तृत्वाचे दिग्दर्शन केलेले आहे. ज्ञानदेवानी जरी वारकरी संप्रदायाचा प्रारंभ केला नसला तरी त्याला त्यांनी उत्तम आधार दिलेला आहे. म्हणूनच त्यांच्यावरील संप्रदायाची इमारत गेली सातशेवर्षे अभंग आहे "मराठी भाषेच्या नगरीत ब्रम्हविद्येचा सुकाळ करुन ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायातील साध्याभोळ्या भक्तीला आध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक मिळवून दिली. रुढीपेक्षा मानवतेला, शब्द - - प्रामाण्यापेक्षा अंत:स्फूर्तीला आणि उच्च उच्चारापेक्षा आत्मविकासाला त्यांनी प्राधान्य दिले. सर्व सामान्य लोकांचा आवाका ओळखून त्यांनी भक्तीचा प्रचार केला. परंतु त्यातही ज्ञानाची प्रतिष्ठा ढळू दिली नाही." १४

ज्ञानदेवांनी ज्ञानयुक्त भक्तीचा गौरव केला आणि डोळस भक्तीचा प्रचार केला. या सर्व कर्तृत्वाच्या मुळाशी ज्ञानदेवांचे सुसंस्कृत, सर्वसमावेशक, करूणेने अपार भरलेले आणि आर्तांच्या उध्दारासाठी अहर्निश तळमळणारे मन होते. त्या विश्वैक्यवादी संवेदनशील मनाने ही वारकरी संप्रदायाची उभारणी केली.

ज्ञानेश्वर व संत मंडळ --

ज्ञानेश्वरांच्या अलौकिकत्वाची साक्ष त्यांच्या समकालीन संतानीही दिलेली आहे. त्यांच्याविषयी सर्वांचा प्रेमभाव होता. ज्ञानेश्वरांची छाप बहुतेकांच्या वाणीवर पडलेली स्पष्ट दिसते. ज्ञानेश्वरांच्या विचारावरच काहीचे पिंड पोसलेले आहेत. ज्ञानदेवांच्या श्रेष्ठ अधिकार सर्वांनी मान्य केलेला आहे. ज्ञानोत्तर भक्तीचे रहस्य

सर्वांनाच ज्ञानदेवापासून उमगलेले आहे. ज्ञानदेव सर्व संतसमागमाचा आनंद उपभोगत होते. ज्ञानेश्वरांच्या व नामदेवांच्या भेटीतला आनंद तीर्थावळीच्या अभंगात नामदेवानीच स्वमुखानी व्यक्त केलेला आहे.

संत जनाबाई ज्ञानदेवांवरील आपली निष्ठा व्यक्त करताना म्हणते --

विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।।१।।
मरोनिया जावे । बा माझ्याच पोटा यावे ।।२।।

"संत मंडळाचे आचार्य अध्यक्ष व गुरु ज्ञानेश्वर हेच आहेत. सर्वांनी एकमुखानी त्यांना तसे मानले आहे. त्यांनी संत संघटना केली.सारे संत एकवटले. सर्वांना स्वसुखाचा मार्ग दाखविला. वेदपरंपरा त्यांच्या ठिकाणी मूर्त झाली. आपेगावी जन्मले नेवाश्यास ज्ञानेश्वरी रचिली. पंढरपुरास जाऊन सर्व संतमेळा भजनी लावला अवघ्या सहा वर्षांच्या काळात पंढरपूराच्या वाळवंटात भागवत धर्माचा नगरा पिटला. एवढे मोठे कार्य दुसऱ्या कोणात्याही धर्म संस्थापकाने इतक्या अल्पावकाशात केलेले नाही." १५

समारोप --

ज्ञानेदेवांच्या जीवन चरित्राची समाप्ती त्यांच्या संजीवन समाधीने होते. परंतु त्यांच्या कार्यप्रभावाला परिसीमाच उरत नाही. ज्ञानदेवांच्या जन्म घटनेपासून ते समाधी घेण्याच्या प्रसंगापर्यन्त ज्ञानदेवांचे जीवन चरित्र अनेक चमत्कारानी भारावलेले आहे. चमत्काराचा भाग वजा केला तरी ज्ञानदेवांच्या अलौकिक सामर्थ्याच्या खुणा त्यांच्या वाङ्मय कर्तृत्वात आहेत. 'पसायदान' हे ज्ञानदेवांच्या विश्वात्मक व्यक्तिमत्वाचे ठळक उदाहरण आहे. ज्ञानदेवांच्या अलौकिकतेचे मर्म त्यांच्या जीवन - चरित्राच्या घडणीत आहे. मुखपृष्ठापासून ते जॅकेटातील मजकूरापर्यन्त एखाद्याच पुस्तकाचे अंतर्बहिरंग आटोपशीर व वैशिष्ट्यपूर्ण असते तशी घडण ज्ञानदेवांच्या

जीवनचरित्राची आहे. ज्ञानदेवानी जपलेल्या सत्यवादाची प्रतीती त्यांच्या जीवनचरित्राच्या महन्मंगलतेत आहे.

ज्या ज्या तत्वांचा ज्ञानदेवांनी पुरस्कार केला ती ती तत्वे त्यांनी स्वत: वर्तूनिया जनापुढे ठेविली. ` ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद ` हा हरिनाम जप त्यांनी स्वोच्चारातून सिध्द केला. संप्रदायाच्या तत्वज्ञानाचा आधारग्रंथ म्हणून ` ज्ञानेश्वरी ` आत्मज्ञानाची अनुभूती सांगण्यासाठी अभंगाचा प्रपंच मांडला. वेदमार्ग, योगमार्ग किंवा सन्यासमार्ग यांच्या ऐवजी भक्तिमार्गाचे आचरण करण्याची शिकवण दिली. सदाचारातून आत्मशुध्दी हा मार्ग समाजाला दाखविला. गुरूमहात्म्य जनमानसावर जिंबवले. सांप्रदायिकांना सन्मार्गाचे दिग्दर्शन करुन धर्मक्षेत्रावरील सर्वसामान्याची होणारी कुचंबणा थांबवली.

ज्ञानेश्वरादी भावंडाना लहानपणीच वेदांतज्ञान प्राप्त झाल्याने ही भावंडे स्वार्थपरायण ब्राह्मणवर्गाच्या स्वार्थामधील अडचण होणार हे जाणून स्वार्थपरायण ब्राह्मण वर्गाने ज्ञानेश्वरादी भावंडाना बहिष्कृत केले. बहुजन समाजाला या भावंडाविषयी जिव्हाळा असूनही धर्मसत्तेच्या बडग्याला घाबरुन बहुजन समाज गप्प होता. ज्ञानदेवांचे वेदांत अध्ययन पूर्ण झाल्याने त्यांना ख-या धर्माचे स्वरूप उमगले. ज्ञानदेवांचे अंत:करण समाजहितचिंतकाचे असल्याने त्यांनी खरा धर्म समाजाला समजावून सांगण्याच्या भूमिकेने ज्ञानदेवींचे प्रयोजन केले. ज्ञानदेवांच्या निरूपणाने समाजाला ख-या धर्माचे स्वरूप समजले आणि स्वार्थपरायण धर्ममार्तंडाचे पितळ उघडे पडले. बहुजन समाजाने ज्ञानदेवाचे आध्यात्मिक नेतृत्व मान्य केले. ज्ञानदेवाना बहुजन समाजाने समाजाचे मातृत्व बहाल केले. ज्ञानदेव बहुजन समाजाची माऊली बनले.

आध्यात्मिक लोकशाहीला पाया ज्ञानदेवानी घातला. वर्णभेदाच्या गढीच्या पायातच सुरूंग लावण्याचे कार्य ज्ञानदेवानी केले. गढीला हादरे बसून ढपले पडण्याची प्रक्रिया सुरू झाली. परंतु ब्राह्मणवर्गाच्या वर्चस्वामुळे मेगा साधण्याचे कार्यही जोरात झाले. ज्ञानदेवांनी सुरू केलेल्या समाज सुधारणेच्या कार्याची पूर्तता करण्याचे काम

तद्नंतर संतानी व समाज सुधारकानी केलेले आहे. ज्ञानदेवांचे समाजसुधारणा करण्यासाठी धडपडणारे सुप्त मन त्यांच्या वाङ्.मयीन कर्तृत्वातून तरळपणे जाणवले.

ज्ञानदेव रचित जे वाङ्.मय धन आहे ते माणसाला माणसासारखे वागावयाला शिकविणारे आहे. मानवाचा महामानव करण्याचे सामर्थ्य ज्ञानदेवांच्या ध्वनीत आणि वाणीत आहे. ज्ञानेश्वरपूर्वकाळात महाराष्ट्रामध्ये धर्म विचार ईश्वरोपासना आणि धर्मकांड यांचे जे अराजक माजले होते त्याची मूळ कारणे शोधून त्या कारणांच्या निर्मूलनासाठी ज्ञानदेवांनी ज्ञानदेवीरूपी शस्त्र निर्माण केले. आज धर्म व राजकारण यांची गल्लत झालेली आहे. माणूस माणसापासून तुटला जात आहे. भंगणारी मने अभंग राखण्यासाठी व प्रेमाचा जिव्हाळा उत्पन्न करण्यासाठी ज्ञानीयांचा राजा ज्ञानदेव यांची स्मरणभक्ती करणे नितांत गरजेचे आहे.

## संदर्भ


१ तुळपुळे शं.गो.," पाच संतकवी", दुसरी आ.,१९६२, पृ.१-२

२ थावरे दा.का.," ज्ञानाई" , प्रथमावृत्ती, १९७६, पृ.७

३ डॉ.नसिराबादकर ल.रा.," प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास",
दुसरी आ.,१९७६, पृ.४५

४ सुपेरकर बा.मा.," श्रीज्ञानेश्वर वाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास",
प्रथमावृत्ती,१९६६,पृ.१८-१९

५ डॉ.नसिराबादकर ल.रा.," नवभारत", ज्ञानेश्वर विशेषांक,मधील
"ज्ञानेश्वरांची सामाजिक करूणा",हा लेख",पृ.१२७

६ माडखोलकर ग.त्र्यं," महाराष्ट्राचे विचारधन", प्रथमावृत्ती,१९७३,पृ.१-२

७ डॉ.पेंडसे शं.दा.," महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास", चौथी आवृत्ती,
१९६५,पृ.१३८

८ शेणोलीकर ह.श्री.," प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप",प्रथमावृत्ती,
१९७१,पृ.३१

९ सरदार गं.बा." महाराष्ट्र धर्माचे प्रणेते" मधील" मराठी संताचे सांस्कृतिक
कार्य," हा लेख, पृ.१३३

१० टेंभुर्णीकर के.ल.," ज्ञानेश्वरदर्शन अध्यात्म"(खंड नं.२) मधील "चांगदेव
पासष्टीचे रहस्य", हा लेख, पृ.५६१

११ डॉ.नसिराबादकर ल.रा.," प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास",पृ.४५

१२ डॉ.इनामदार सुहासिनी," प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्.मयीन कार्य," प्रथमावृत्ती,१९८०, पृ.६५

१३ - तत्रैव - पृ.६६

१४ सरदार गं.बा.," संत वाङ्.मयाची सामाजिक फलश्रुती", दुसरी आवृत्ती, पृ.१२६

१५ पांगारकर ल.रा.," मराठी वाङ्.मयाचा इतिहास", खंड १,दुसरी आवृत्ती, १९७२, पृ.३९०-९१